
अख्तर हमीद खान




रुमाना हुसेन


अख्तर हमीद खान




मराठी अनुवादः सुशील मेन्सन


डॉ. अख्तर हमीद खान यांचा जन्म 1914 साली भारतातील आग्रा शहरात झाला. शेकडो वर्षांपूर्वी हे शहर मोगल सम्राट अकबर याची राजधानी होती. मोगल बादशहा शाहजहान याने सुप्रसिद्ध ताजमहाल याच शहरात उभारला. आजही ही वास्तू तिथे दिमाखात उभी आहे.





अख्तर नेहमी ज्ञानाचा शोध घेत असतात. ते ज्ञानी लोकांचा आदर करतात. बघ ना, मी घरच्याघरीच उर्दू भाषा, धार्मिक ग्रंथ एवढंच काय, इंग्रजी भाषासुद्धा शिकत गेले.
अम्माजी, आम्हाला मोठं करताकरता तू एवढं सगळं कसं केलंस?


या गरीब मुली आणि स्त्रिया, श्रीमंत स्त्रियांपेक्षा वेगळ्या आहेत. या स्त्रिया खूप कष्ट करतात. पण त्यांनी शिक्षणही घेतलं पाहिजे असं वाटतं.


अख्तर हमीद खान यांनी बी.ए. साठी इतिहास आणि तत्वज्ञान हे विषय निवडले. ते उत्तम गुण कमावून पदवीधर झाले. मग त्यांनी इंग्रजी साहित्यात मास्टर्स पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी भारतीय नागरी सेवा (I.C.S.) परीक्षा दिली आणि त्यात प्रथम क्रमांक मिळवला. त्यावेळी भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. त्यांनी अख्तर यांना सरकारमध्ये उच्च पदाची नोकरी दिली.




नंतर, प्रशासकीय अधिकारी असताना अख्तर हमीद खान यांचा मशरिकी यांच्या विचारांबाबत भ्रमनिरास झाला. मुस्लीम वस्त्यांमधील दारिद्र्य पाहून अख्तर हेलावले.




तुम्ही राजीनामा का देताय? काय झालं?
मी माझे ब्रिटिश शिक्षक आणि अधिकारी यांच्याकडून बरंच काही शिकलो. पण आता मला कारागीर आणि कष्टकरी यांच्याकडून काही शिकायचंय.


सर, मी ऐकलंय की तुम्ही सरकारमध्ये मोठ्या पदावर काम केलंय. आमच्यासारख्या दरिद्री लोकांचा तम्हाला काय फायदा?
खरंय, मी सरकारमध्ये नऊ वर्ष उच्च पदावर काम केलंय. पण गरीबांना पाहून माझं मन दु:खाने गलबलून जातं, शरमेने अर्धमेलं होतं.
आपण काम करतो त्या शासनाच्या धोरणामुळे गरीब लोक नाडले जातायत, देशप्रेमी बंडखोरांना अटक होतेय, हे पाहून माझं अंतर्मन मला छळायचं. लहानपणी, आई मला मुस्लीम नेते *मोहम्मद बिन कासीम* आणि *खालीद बिन वालीद* यांच्या गोष्टी सांगायची. त्या ऐकून मलाही सत्ता हवीहवीशी वाटू लागली. मग मला कळलं की तो माझा भ्रम होता. त्या भ्रमातून मी माझी सुटका केली.


तुम्ही लिहा-वाचायला शिकलात तरच तुमचं आयुष्य सुधारेल. तुम्ही अलिगढची प्रसिद्ध कुलपे बनवता. तुमची कुलपे साऱ्या भारतात वापरतात. तुमची कुलपे उत्तम आणि टिकाऊ आहेत. पण तुम्हा सगळ्यांमध्ये एकी हवी. तुम्ही शिकलात, सगळ्यांनी मिळून काम केलंत तर तुमची स्थिती नक्की सुधारेल.



1947 साली अख्तर हमीद खान दिल्लीच्या जामिया मिलिया कॉलेजमध्ये प्रोफेसर बनले. याच वर्षी भारत ब्रिटिशांच्या अंमलाखालून स्वतंत्र झाला. फाळणीमुळे 5 लाख मुस्लीम दिल्लीतून पाकिस्तानला गेले. 10 लाख हिंदू आणि शीख पाकिस्तानमधून दिल्लीला आले. काहीच आठवड्याच दिल्ली एक वेगळे शहर बनले.


EXIT
GATE
12
स्वागत. प्रवासात काही अडचण तर नाही आली?
तुमचे खूप आभार. काही अडचण आली नाही.
तुमचे आणि तुमच्या कुटुंबाचे स्वागत असो. *कोमिल्लाच्या* व्हिक्टोरिया कॉलेजचे प्रिन्सिपल झाल्याबद्दल तुमचं अभिनंदन.
आभार. आपण थेट कॉलेजमध्ये जायचं का?


पाकिस्तानाच्या ग्रामीण भागाची परिस्थिती सुधारण्यासाठी दोन संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी एक पश्चिम पाकिस्तानात *पेशावर* शहरात होती. दुसरी संस्था पूर्व पाकिस्तानात *कोमिल्ला* शहरात होती. कोमिल्ला प्रकल्पांतर्गत 300 गावांमध्ये काम सुरू झाले.



1959 साली अमेरिकेहून परतल्यावर अख्तर हमीद खान यांनी कोमिल्ला अकादमीत कामास सुरुवात केली. गावांची स्थिती सुधारण्यासाठी अकादमीने काही अत्यावश्यक गोष्टी केल्याः 1. जुनाट कालव्यांची दुरुस्ती करून पाणीपुरवठ्यात सुधारणा केली. 2. कच्च्या रस्त्यांची दुरुस्ती करून नवीन रस्तेही बनवले. यामुळे शेतकऱ्यांना आपला माल गावातून बाजारापर्यंत नेणे शक्य झाले.










कोमिल्लातील गावांना असंख्य समस्यांना तोंड द्यावे लागत होते. पूर, वादळे, दुष्काळ, वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि नष्ट होणारी पिके यामुळे शेतकरी गळ्यापर्यंत कर्जात बुडालेले होते. त्यात ते अज्ञानी आणि अशिक्षित होते. या सगळ्या आव्हानात्मक परिस्थितीत अख्तर हमीद खान कोमिल्ला अकादमीच्या संचालकपदी रुजू झाले. पाकिस्तान सरकारने ही अकादमी 1956 साली सुरू केली होती.





रेमन मॅगसेसे पुरस्कार, मनिला, फिलीपिन्स
13 ऑगस्ट 1963
Ramon Magsaysay Award
Manila, Philippines
13 August 1963
या पुरस्कारासाठी मी आपला खूप आभारी आहे. या पुरस्कारामुळे माझ्या कार्याची ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर होईल. आपण एवढा आदर दाखवल्याबद्दल मी सन्मानित झालो आहे.



तोवर, म्हणजे 1971 पर्यंत, पाणीपुरवठ्यासाठी 250 पोलीस ठाण्यांमध्ये थाना सहकारी संघटना स्थापन करण्यात आली. इंडोनेशिया, कंबोडिया, नेपाळ, भारत यांसारख्या देशांनी कोमिल्ला प्रकल्पाच्या धर्तीवर आपल्याही देशात प्रकल्प राबवण्याचे प्रयत्न केले.


1971 साली अख्तर हमीद खान यांना पश्चिम पाकिस्तानला पाठवण्यात आले. तिथे दोन वर्षे त्यांनी फैसलाबाद आणि कराची विद्यापीठात काम केले. नंतर ते आपला मित्र *शोएब सुलतान*सोबत पेशावरला गेले आणि तिथे *दाऊदझाई* प्रकल्पावर काम सुरू केले. हा प्रकल्पही कोमिल्ला प्रकल्पाच्या धर्तीवरच होता.










सर, आम्ही ऐकलंय की तुम्ही उर्दू आणि इंग्रजीशिवाय बंगाली, पर्शियन, अरेबिक, हिंदी आणि संस्कृत भाषाही जाणता. एवढ्या साऱ्या भाषा तुम्ही कशा शिकलात?
मी माझ्या गरजा खूप कमी केल्यायत. त्यामुळे मला हे शिकायला वेळ मिळतो.
UNIVERSITY OF KARACHI
कराची विद्यापीठ



शोएब सुलतान, नव्या सरकारला आपल्या कामाचं महत्त्व वाटत नाही. आता पूर्व पाकिस्तान एक नवं राष्ट्र, *बांग्लादेश*, बनलंय. त्यामुळे सरकारला आपली आवश्यकता वाटेनाशी झालीय.


ठिकाय. लवकरच आपण वयाची साठी गाठू. भरपूर काम केलंय आपण आयुष्यभर. आता थोडा आराम करू.


मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीला काय उत्तर पाठवणार तुम्ही?
तसंही इथे मला कचऱ्यागत वागणूक मिळतेय. त्यामुळे मिशिगनला जाणं हिताचं आहे, असं वाटतं.
तिथे तुम्हाला डेव्हलपमेंट स्टडीजचे प्रोफेसर हे पद देतील. ज्या विषयात तज्ज्ञ आहात, तोच विषय शिकवायला सांगतील तिथे.
खरंय, शफीक. तू आणि आयेशा माझ्यासोबत तिथे जाण्याची तयारी सुरू करा.


पाकिस्तान
पेशावर
बांग्लादेश
कोमिल्ला


मिस्टर अख्तर हमीद खान, मला अभिमान वाटतोय की ग्रामीण भागात आपण केलेल्या अतुलनीय कार्यासाठी मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीकडून आपल्याला सन्माननीय डॉक्टरेट प्रदान केली जात आहे. अभिनंदन.
MICHIGAN STATE UNIVERSITY
मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटी





डॉ. अख्तर हमीद खान दोन वर्षे अमेरिकेत शिकवून कराचीत परतले. वयाची 60 वर्षे पूर्ण झाली तरी त्यांचा उत्साह टिकून होता. *बँक ऑफ क्रेडिट अँड कॉमर्स*चे प्रमुख श्रीयुत *आगा हसन अबेदी* यांनी त्यांच्यासमोर कराचीतील *ओरंगी* भागात एक सेवाभावी हॉस्पीटल आणि शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवला.





हे शहर मला नवखं आहे. मला त्याची नीटशी ओळख नाही, पण आता हेच माझं घर आहे.
डॉक्टरसाहेब, कराचीत परतल्यावर तुम्हाला कसं वाटतंय?



तुम्हाला माहितच आहे, डॉक्टरसाहेबांकडे फक्त एक जुनी जीप आहे. त्यातूनच ते दौरा करायला जातात. त्यांच्याकडे ना कर्मचारी आहेत, ना कार्यालय.
ओरंगीचे लोक स्वावलंबी आहेत. त्यांनी घरं, शाळा आणि दवाखाने स्वत:च्या हिंमतीवर उभे केलेयत. पण मला तीन महत्त्वाचे प्रश्न पडलेयत:
• या लोकांच्या कामाची पद्धत काय? (ते स्वावलंबनाच्या तत्वावर काम करतात).
• मग त्यांच्या समस्या का सुटत नाहीत? (कारण तांत्रिकदृष्ट्या त्यांचे बांधकाम कमकुवत आहे. त्यामुळे ते लवकर खराब होते).
• यासाठी काय करता येईल? त्यांना मदत होईल असे तांत्रिक प्रशिक्षण कसे देता येईल?



हा काही सरकारी प्रकल्प नाही, ना सरकार याला पैसा पुरवतंय. ओरंगीमध्ये मला माझे अनुभव लागू करायचेयत. त्यानुसार, आधी संशोधन करायला हवं, मग अनुभवातून शिकायला हवं आणि शेवटी, ते इतरांना शिकवायला हवं.
ओरंगी प्रायोगिक प्रकल्प
OPP
Orangi Pilot Project




कराचीतील ओरंगी या भागात सर्वात जास्त गरीबी आढळते. तेथील लोकसंख्या 12 लाखांपेक्षाही जास्त आहे. तिथे उर्दू, पंजाबी, सिंधी, बलुची आणि पश्तू भाषिक लोक राहातात. बांग्लादेशमधून आलेले बिहारी भाषा बोलणारे लोकही तेथे राहातात.





चांगला प्रश्न आहे. आम्ही चौकशी केली तेव्हा कळलं की येथील लोक स्वच्छता आणि नाले वगैरे बाबी सरकारची जबाबदारी आहे, असे मानतात. मी तुम्हाला यासाठी बोलावलं की आपल्याला या लोकांना संघटीत करायचंय आणि त्यांना तंत्रकुशल बनवायचंय. आपण त्यांना शौचालयांमध्ये फ्लश व्यवस्था आणि भूमीगत गटारांना मॅनहोल बसवण्याचं प्रशिक्षण द्यायचं.
त्यासाठी आपल्याला आधी रस्त्यांची मापं घ्यावी लागतील आणि त्यांचे नकाशे बनवावे लागतील.
अगदी बरोबर.



माझी दोन मुलं आजारी असतात. आम्ही त्यांच्या औषधांवर इतका खर्च केला, पण त्यांची तब्येत सुधारली नाही. मला वाटतं, कुणीतरी त्यांच्यावर करणी केलीय.
त्यांना बाबांकडे न्या. ते तुम्हाला अंगारा देतील. तो आजाराला पळवून लावेल. कुणी मुलांना नजर लावली किंवा करणी केली तर तुम्हाला लगेच कळेल. बाबांकडे खूप साऱ्या दैवी शक्ती आहेत.
Dental Clinic
DENTIST
عامل بشیر
سارے مسائل کا حل



DOLLAR
For bold hard writing
بنگال کا کالا جادو
نور ہوٹل
پروفیسر دلبر
عامل بابا
ساری پریشانیوں اور بیماریوں کا علاج.
کا آستانہ
ASHA ALLAH
IRYANI & JUICE
CHINESE
DR PETER KUO






शौचालयात फ्लश आणि भूमिगत नाल्यांचे पाईप टाकले की सगळा भाग कसा स्वच्छ राहील.
आणि मग आजार पसरणार नाहीत.
ओरंगीच्या गरीब लोकांसाठी सरकारी स्वच्छता सुविधा खूप महागड्या आहेत. डॉक्टरसाहेबांचं स्वावलंबनाचं तत्व लागू केलं तर ओरंगीची चांगली प्रगती होईल.

स्वच्छता व्यवस्था लागू केल्यावर ओरंगी प्रायोगिक प्रकल्पाने घरबांधणीवर लक्ष केंद्रीत केले. प्रकल्पाच्या आर्किटेक्ट वगैरे तज्ज्ञांनी सिमेंट आणि वाळूच्या विटांचे साचे बनवले. त्यांनी गवंड्यांना प्रशिक्षणही दिले. तसेच इतर घरांपेक्षा स्वस्त अशा घरांचे नमुने विकसित केले.




डॉक्टरसाहेब, आपल्या प्रकल्पाच्या सर्वेक्षणानुसार, ओरंगीतली 11,000 दुकाने आणि वर्कशॉप हजारो लोकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करतात. *परवीन*, तुमच्याकडे आजुबाजूचा परिसर आणि रस्त्यांबद्दल काय माहिती आहे?
अन्वर रशीद, या संपूर्ण परिसरात 110 विभाग आणि 6,347 रस्ते आहेत. *आरीफ हसन*, तुम्हाला माहितीय की डॉक्टसाहेबांना तिथे आरोग्य आणि कुटुंब नियोजनासाठी एक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करायचीय.


स्वच्छता सोयी 1981
महिला कल्याण 1984
आरोग्य, स्वस्त उपचार
आणि कुटुंब नियोजन 1985
निवारा/घर 1986
कुटुंब कल्याण
(होम वर्कशॉप) 1987
कर्ज सुविधा 1989
ग्रामीण विकास प्रकल्प 1992
शैक्षणिक सुधारणा 1995




गेल्या दहा वर्षांच्या अनुभवातून काही गोष्टी स्पष्ट होतात:

1. जेव्हा लोकांना समस्या भेडसावतात, तेव्हा ते त्यातून स्वत:च मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात.
2. आपण ओरंगीत जे काम केलं, त्यासाठी बाहेरून पैसा घेतला नाही. सगळं काही स्थानिक साधनसंपत्तीतून केलं.
3. समाज आणि सरकार यांच्यात सहकार्य असेल तर समाजाच्या सर्व समस्या दूर होऊ शकतात. स्वच्छतेची समस्या तेव्हाच सुटली जेव्हा सरकारने मुख्य लाईन टाकल्या आणि लोकांनी स्वत: रस्त्यांवर गटारलाईन टाकल्या.


लोक आपल्या समस्या स्वत: सोडवू शकतात. पण यशस्वी होण्यासाठी त्यांना काही तांत्रिक मदत लागते. इथे काम करण्यासाठी आपण बाहेरून पैसा घेतला नाही. सगळा खर्च इथल्या लोकांनीच केला. समाज आणि सरकार यांच्या भागीदारीतून प्रत्येक समस्या सुटू शकते. यात सरकारवर जास्त जबाबदारी आहे. जेव्हा स्थानिक लोक प्रकल्पाची देखरेख आणि व्यवस्था पाहातात, तेव्हा अशी भागीदारी फायदेशीर ठरते.

आपल्या प्रकल्पाने लोकांना तांत्रिक मदत, सल्ला आणि कर्ज पुरवण्यासाठी तीन संस्था स्थापन केल्या आहेत.

1. संशोधन आणि प्रशिक्षण संस्था. ही लोकांची सुरक्षितता, पूरग्रस्त व भूकंपग्रस्तांना मदत आणि महिला बचतगट हे प्रकल्प चालवते.
2. लोकांचे आरोग्य आणि सामाजिक विकास यांसाठी संस्था.
3. ओरंगी सेवाभावी संस्था आणि ग्रामीण मायक्रोक्रेडिट संस्था.



करांचीच्या झोपडपट्ट्या इतक्या काही वाईट नाहीत. आपण त्यांना गरीब भाग म्हणू. 1984 ते 1994 या काळात या सगळ्या भागांना सरकारने अधिकृत दर्जा दिलाय.





डॉ. अख्तर हमीद खान यांचं 19 ऑक्टोबर 2000 रोजी अमेरिकेत निधन झाले. 1988 साली त्यांनी आपल्या प्रकल्पाच्या तीन संस्थांचा कारभार लोकांकडे सोपवला. 1992 साली प्रकल्पाचे कार्यालय एका नव्या साध्यासरळ इमारतीत हलवण्यात आले.

डॉक्टसाहेबांची शवपेटी कराचीत आणून तिचे प्रकल्पाच्या या नव्या इमारतीत दफन करण्यात आले. अशा तऱ्हेने या महान पाकिस्तानी व्यक्तिच्या आयुष्याची इतिश्री झाली. त्यांनी गरीबांसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांचे नाव पाकिस्तानच्या इतिहासात अमर झाले.